नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १०/०९/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत १५ कि.मी अंतरावरील येथे दिनांक ०९/०९/२०२२ चे १६.३० वा. ते १७.०० वा. दरम्यान आरोपी नामे– राकेश पुरुषोत्तम गजभिये, वय ३० वर्ष, रा. मकराधोकडा हा आपल्या आई वडिलासह पोलिस चौकी मध्ये आला व सफौ अजितसिंग ठाकुर यांना बोलला कि "मि दि. ३१/०८/२०२२ रोजी गैरअर्जदार नामे मंगेश जाधव यांचे विरूध्द पोलिस स्टेशन उमरेड येथे तक्रार दिली होती. त्या तक्रारीवर तुम्ही कोणती कारवाई केली मला दाखवा. तुम्ही काहीही कारवाई करीत नाही" असे म्हणत त्याने सोबतच आपल्या स्वत:चे मोबाईलने व्हिडीओ शुटींग काढणे सुरू केले. यावरून सफौ अजितसिंग ठाकुर यांनी म्हटले कि, ''तुम्ही व्हिडीओ रेकॉर्डिंग का करीत काढत आहे' असे म्हटले वरून त्याने आपला मोबाईल पॅन्टच्या डाव्या खिशात लपवित असल्याने फिर्यादीस संशय आला त्यावरून सफौ अजितसिंग ठाकुर यांनी म्हटले कि, तु काय व्हिडीओ रेकॉर्ड केले आहे ते आम्हाला दाखव त्यावरून आरोपीने म्हटले कि, 'माझा मोबाईल आहे मि काही पण करेल' असे म्हटल्यावरून फिर्यादीने त्याचा मोबाईल मागण्यासाठी डावा हात समोर केला असता आरोपीने फिर्यादीचे डाव्या हाताच्या तर्जनी बोटाला दाताने चावा घेतला. तसेच उजव्या हाताच्या मनगटावर नखाने ओरबडुन सोबत आणलेल्या ॲक्टिवा गाडिने पळुन गेला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोना महमुद पठान पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३५३, ३३२ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि दिनेश खोटेले मो.नं. ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर